| | | | |
|---|---|---|---|
| MHGO040002982024 | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>**[ न्यायनिर्णय दि.०६/०५/२०२६]**<br>**सं.फ़ौ.ख.क्र. १६८/२०२४**<br>**कालावधीःव.०२,म.०१,दि.१४. नि. क्र. ३१** | | |
| | ( गुन्हा क्र. ४०२/२०२३, पोलीस स्टेशन, सालेकसा ) | | |
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया | |
| **सहा. सरकारी वकील** | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर,** | |
| **आरोपी** | | **राधेश्याम सोमाजी भगत,**<br>वयः ५३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. निंबा, पिपरीया ता. सालेकसा जि. गोंदिया. | |
| **आरोपीतर्फे वकील** | | **विधिज्ञ एन. वाय. शेख,** | |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि. ०५.११.२०२३. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि. ०५.११.२०२३. |
| **फिर्यादची तारीख** | दि. ०५.११.२०२३. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि. १३.०२.२०२४. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि. ०१.०३.२०२४. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि. २०.०३.२०२५. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि. ०५.०६.२०२५. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | -- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि. ०६.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | -- |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| **आरोपीचे नाव** | राधेश्याम सोमाजी भगत, |
| **अटकेची तारीख** | -- |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि. ०१.०३.२०२४. |
| **दोषारोप** | प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (च)(ज)(झ) व ५ (अ) (१), ५ (अ) (२) ५ (ब), प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

## साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार

**अ) अभियोगपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच)** |
|---|---|---|
| अ.सा.१ | कुमारसिंग प्रेमसिंग मच्छिरके, | जप्ती पंच साक्षदार (नि. क्र. ०५) |
| अ.सा.२ | अनिल बुधराम नंदेश्वर, | जप्ती पंच साक्षदार (नि. क्र. ०६) |
| अ.सा.३ | दिनेश अशोक जांभुळकर, | फिर्यादी साक्षदार (नि. क्र. २४) |

**ब) बचावपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.

### अ) अभियोगपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | २५ | फिर्याद |
| ०२ | २६ | छापील फिर्याद |

### ब) बचावपक्ष

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क) कोर्ट

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### ड) मुद्देमाल

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६ मे २०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा खटला प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (च)(ज)(झ) व ५ (अ) (१), ५ (अ) (२) ५ (ब) अन्वये आरोपीविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थीती खालील प्रमाणे;

०२. फिर्यादी पो. शि. दिनेश अशोक जांभुळकर याने अशी फिर्याद दिली की, दिनांक ०५.११.२०२३ रोजी १५:३० वाजताचे सुमारास पानगांव साखरीटोला जंगल परीसर येथे आरोपी नामे राधेश्याम सोमाजी भगत याने लाल, पांढऱ्या, काळ्या रंगाचे एकुण १३ लहान मोठे गोवंश जातीचे जनावरांना दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक देवून चारापाण्याची

कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या बांधुन ठेवलेले मिळुन आले. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सालेकसा येथे फिर्याद दाखल केली.

०३. फिर्यादवरुन सालेकसा पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४०२/२०२३ प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (च)(ज)(झ) व ५ (अ) (१), ५ (अ), (२) ५ (ब) अन्वये नोंदविण्यात आला व गुन्ह्याचा तपास पोलीस ना. तेजराम उईके यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी मौका जप्ती पंचनामा व साक्षीदारांची जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

०४. या न्यायालयाने आरोपपत्राचे दखल घेऊन आरोपीविरूध्द प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (च)(ज)(झ) व ५ (अ) (१), ५ (अ) (२), ५ (ब) अन्वये नि. क्र. ०४ वर निश्चित केले. आरोपीने निवेदन करुन दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. अभियोगपक्षाचे व आरोपीच्यावतीने त्यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे खालील मुद्दे उपस्थीत होतात ते निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०५.११.२०२३ रोजी १५:३० वाजताचे सुमारास पानगांव साखरीटोला जंगल परीसर येथे आरोपीने लाल, पांढऱ्या, काळ्या रंगाचे एकुण १३ लहान मोठे गोवंश जातीचे जनावरांना दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक देवून चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या बांधुन ठेवलेले मिळुन आले काय ? | नकारार्थी |
| **२.** | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ एकूण तीन साक्षीदार तपासले आहेत. जप्ती पंच सा. क्र. ०१ कुमारसिंग प्रेमसिंग मच्छिरके यास नि. क्र. ०५ वर, पंच सा. क्र. २ अनिल बुधराम नंदेश्वर यास नि. क्र. ०६ वर आणि फिर्यादी सा. क्र. ०३ दिनेश अशोक जांभुळकर यास नि. क्र. २४ वर साक्ष नोंदविली. अभियोगपक्षाने नि. क्र. २७ वर पुरसीस दाखल करुन त्यांच्या साक्ष पुरावा बंद केला.

०७. अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नि. क्र. २८ वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेच्या निवेदनातील प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून तसेच आरोपींच्या विद्वान वकीलांनी, अभियोगपक्षाच्या साक्षीदारास विचारलेल्या प्रश्नांवरून त्यांच्याविरुध्द खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा त्यांचा बचाव असल्याचे दिसून येते.

**<u>साक्षीपुरावाः–</u>**

०८. जप्ती पंच सा. क्र. १ कुमारसिंग प्रेमसिंग मच्छिरके व पंच सा. क्र. २ अनिल बुधराम नंदेश्वर यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरिता बोलाविले होते. मौका जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही आहे. परंतु, त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. पोलिसांनी त्यांच्या समक्ष काही जप्त केले नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास अनुकूल साक्ष देत नसल्याने त्यांना सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासात प्रश्न विचारले. मात्र त्यामध्ये कोणतीही बाब अभियोगपक्षाच्या कामी आली नाही.

०९. सा. क्र. ३ दिनेश अशोक जांभुळकर याने त्याच्या सरतपास असे कथन केले आहे की, घटना दिनांक ०५.११.२०२३ रोजी सकाळी ०३:३० वाजता पानगांव येथे घडली होती. त्यांना गुप्त बातमी मिळाली होती की, घटनास्थळी जनावरांना अवैधरित्या बांधुन ठेवले आहे. घटनास्थळावर जावुन पाहणी केली असता एकुण १३ जनावरे काटेरी कुम्पनाच्या आत बांधुन ठेवले होते. पोलिस उपनिरिक्षक पाटील यांनी पंचासमक्ष पंचनामा तयार केला.

१०. सा. क्र. ३ दिनेश अशोक जांभुळकर याने त्याच्या सरतपास पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर जनावरांना धानोली गौशालात पाठविण्यात आले. चौकशी मध्ये जनावरे भगत

यांची होती असे त्यांना समजले. त्यानंतर त्यांनी घटनेची फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद नि. क्र. २५ वर आणि छापील फिर्याद नि. क्र. २६ वर आहे. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

११. सदर साक्षीदाराचे आरोपीतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला. त्यात त्याने मान्य केले की, घटनास्थळावर इतर लोक नव्हते. जनावरांना जखम असल्याचे त्यांना दिसुन आले नाही. तसेच साक्षीदाराने आरोपीतर्फे विचारण्यांत आलेल्या इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**<u>मुद्दे क्र. १ करिता:</u>**

१२. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता असे दिसून येते की, पंच सा. क्र. १ कुमारसिंग प्रेमसिंग मच्छिरके व पंच सा. क्र. २ अनिल बुधराम नंदेश्वर यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा निसंशयरित्या सिद्ध झालेला नाही. याशिवाय फिर्यादी सा. क्र. ३ दिनेश अशोक जांभुळकर यांच्या पुराव्याचा अवलोकन केले असता घटनास्थळी एकुण १३ जनावरे दाटीवाटीने कत्तल करण्याकरिता बाधुन ठेवले होते. परंतु, त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले आहे की, सदर जनावरे आरोपीचे असल्याचे लेखी पुरावा त्यांना मिळाला नाही. त्यामुळे घटनास्थळावर आरोपीने जनावरांना बांधुन ठेवले होते ही बाब त्यांच्या पुराव्यातुन स्पष्ट होत नाही. तसेच फिर्यादी साक्षदाराने मान्य केले आहे की, पंचा समक्ष पोलिस उपनिरीक्षक पाटील यांनी पंचनामा तयार केला. परंतु, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच साक्षदारांनी त्यांना सहकार्य केले नाही. त्यामुळे सदर साक्षदाराची साक्ष अभियोगपक्षास सहकार्य करत नाही.

१३. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता अभियोगपक्षाने दाखल अधिकारी व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. तसेच फिर्यादी याने जरी फिर्याद सिद्ध केले असले तरी त्याच्या पुराव्याला पुष्टी देणारा एकही स्वतंत्र साक्षदार अभियोगपक्षाने तपासले नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षदारांनी त्यांना सहकार्य केले नाही. म्हणुन आरोपीने लाल, पांढऱ्या, काळ्या रंगाचे एकुण १३ लहान मोठे गोवंश जातीचे जनावरांना दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक देवून चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या बांधुन ठेवले ही बाब उपलब्ध पुराव्यातून अभियोगपक्षाने सिद्ध केलेली नाही. म्हणून आरोपीस प्रस्तुत प्रकरणातून सबळ पुरावा अभावी निर्दोषमुक्त करणे न्यायोचित होईल

असे माझे स्पष्ट मत आहे. प्राप्त परिस्थिती मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**मुद्दा क्र. २ करिताः–**

१४. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **राधेश्याम सोमाजी भगत** यांना प्रा. छळ प्रति. अधि. १९६० चे कायदा ११ (च)(ज)(झ) व ५ (अ) (१), ५ (अ) (२), ५ (ब) अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, १३ नग लहाण मोठे गोवंश जातीचे जनावरे यांचा ताबा अपील कालावधीनंतर मूळ मालकास परत करण्यात येतो.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.06 15:27:16 +0530

[ ए. आर. जोशी ]

दिनांक : ०६.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.